# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरुवार दि.१५ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १४२ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Thursday 15 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 142 • Pages 4 • Rate 4 Rs


## निवडणूक प्रक्रियेवरील विधाने बिनडोकपणाची

**मुंबई**–मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असताना भाजप आणि ठाकरे बंधूंमधील कलगीतुरा अधिकच रंगला आहे. भाजपचे नेते आशिष शेलार यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती प्रहार केला आहे. राज ठाकरे यांची निवडणूक प्रक्रियेवरील विधाने बिनडोकपणाची असून, पराभवाची चाहूल लागल्यामुळेच ते नवनवीन कारणे शोधत आहेत, त्यांनी पराभवाची कारणे शोधून असले धंदे बंद करावे, असा टोला आशिष शेलार यांनी राज ठाकरेंना लगावला.मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी निवडणूक प्रचार संपल्यानंतर मतदारांना भेटण्यासाठी उमेदवारांना देण्यात आलेल्या परवानगीवर हरकत घेतली. या सरकारला काय हवे आहे? त्यावर हा निवडणूक आयोग काम करत आहे. निवडणूक आयोगाने उमेदवारांना मतदारांची जाऊन भेटण्याची मुभा दिली आहे. पण पत्रके वाटण्याची परवानगी नाकारली आहे.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा

## संक्रांतीआधी महिलांना १५०० रुपयांचा आर्थिक दिलासा; आचारसंहितेतून वाट मोकळी

**“राज्यातील लाडक्या बहिणींना संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मोठा दिलासा मिळाला असून, यंदाच्या महिन्यातील १५०० रुपयांचा हफ्ता आजपासून त्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होऊ लागला आहे. सकाळपासूनच अनेक महिलांच्या मोबाईलवर बँक मेसेज येऊ लागल्याने या योजनेचा लाभ प्रत्यक्षात सुरू झाल्याचे चित्र आहे. राज्यात सध्या महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना आणि आदर्श आचारसंहिता लागू असताना, निवडणूक आयोगाने नियमित लाभ देण्यास परवानगी दिल्यामुळे हा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, एकरकमी तीन हजार रुपये देण्याच्या चर्चांना आयोगाने स्पष्टपणे मज्जाव केल्याने या निर्णयाला राजकीय तसेच प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू आहे. या काळात कोणत्याही नव्या योजना, नवीन लाभार्थी किंवा मतदारांना आकर्षित करणाऱ्या घोषणा करण्यास मनाई असते. याच कारणामुळे ‘लाडकी बहीण’ योजनेअंतर्गत जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरूपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट नकार दिला. मात्र, आधीपासून सुरू असलेल्या आणि नियमित स्वरूपातील लाभ देण्यास आयोगाने परवानगी दिली. त्यामुळे डिसेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हफ्ता आजपासून लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.**

**मुंबई । प्रतिनिधी**

दरम्यान, मकर संक्रांतीच्या निमित्ताने १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे मिळून ३००० रुपये जमा होणार, अशा आशयाच्या बातम्या आणि सोशल मीडियावरील पोस्टमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला होता. या दाव्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाकडे विविध तक्रारी दाखल झाल्या. काही राजकीय पक्ष आणि नागरिकांनी हा प्रकार आचारसंहितेचा भंग ठरतो का, असा सवाल उपस्थित केला. याची दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने थेट मुख्य सचिवांकडे याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते.मुख्य सचिवांनी सादर केलेल्या अहवालात महत्त्वाची बाब स्पष्ट करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशानुसार, निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेल्या विकासकामे व योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवण्यास परवानगी आहे. मात्र, त्या योजनांचा लाभ अग्रिम स्वरूपात देणे, नवीन लाभार्थी निवडणे किंवा लाभाच्या रकमेबाबत बदल करणे हे आचारसंहितेच्या विरोधात ठरते. हीच भूमिका निवडणूक आयोगाने ‘लाडकी बहीण’ योजनेबाबत घेतली.



### १५०० रुपयांचा हफ्ता वेळेत मिळाल्याने समाधान

**अखेर आचारसंहितेच्या कात्रित अडकलेल्या ‘लाडकी बहीण’ योजनेला मर्यादित का होईना, पण मोकळा श्वास मिळाला आहे. तीन हजार रुपयांची अपेक्षा पूर्ण न झाली असली तरी, नियमित १५०० रुपयांचा हफ्ता वेळेत मिळाल्याने अनेक महिलांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मतदानाच्या अवघ्या दोन दिवस आधी सुरू झालेल्या या निधीवितरणामुळे राजकीय आरोप–प्रत्यारोपांना पुन्हा एकदा धार आली असली, तरी निवडणूक आयोगाच्या स्पष्ट आदेशांमुळे हा वाद तात्पुरता तरी शांत झाल्याचे दिसून येत आहे.**

### योजनेचा नियमित लाभ मात्र अग्रिम लाभ देता येणार नाही

**या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट निर्देश दिले की, योजनेचा नियमित लाभ देता येईल; मात्र अग्रिम लाभ देता येणार नाही आणि कोणत्याही नव्या लाभार्थींची निवडही करता येणार नाही. त्यामुळे, तीन हजार रुपयांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले असले तरी किमान १५०० रुपयांचा नियमित हफ्ता तरी वेळेत मिळणार असल्याने कोट्यवधी लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. आयोगाच्या या निर्णयानंतर प्रशासनाने तत्काळ हालचाली करत आजपासून रक्कम थेट बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली.**

## मेडिकलच्या मॅनेजमेंट कोट्याचा महा ठक सौरभला कुलकर्णीला सात दिवसांची पोलिस कोठडी

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांना उच्च व पदवित्तर शिक्षणासाठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रासह गुजरात, चंदिगढ, पंजाबसह इतर राज्यात अनेकांना गंडा घालणाऱ्या महाठक सौरभ कुलकर्णी याला सात दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे.वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांना उच्च व पदवित्तर शिक्षणासाठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रासह अनेक राज्यातील विद्यार्थी यांची फसवणूक करून त्यांच्याकडून कोट्यवधी रु. उकळणाऱ्या महाठक सौरभ कुलकर्णी याला दि. १३ जानेवारी रोजी केज विभागाचे सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकातील पोलिस उपनिरीक्षक सय्यद कराडकर, पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार आणि अनिल मंदे यांनी कराड येथून त्याच्या मुसक्या आवळल्या होत्या.त्या श्री ४२० सौरभ कुलकर्णी याला धारूर येथील प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले असता न्यायाधीश यांनी त्याला २१ जानेवारी पर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे..



## वैद्यनाथ मंदिरासमोर अवकाळी पावसाने उघड केली नगरपरिषदेची निष्क्रियता

### त्वरित उपाययोजना करा; अन्यथा तीव्र आंदोलन–नितीन बागवाले

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

अवघ्या थोड्याशा अवकाळी पावसाने ज्योतिर्लिंग वैजनाथ मंदिरासमोरील नगरपरिषदेच्या स्वच्छता व्यवस्थेची दयनीय अवस्था चव्हाट्यावर आली आहे. नाली तुंबून घाणेचे पाणी, कचरा आणि दुर्गंधी थेट मुख्य रस्त्यावर वाहू लागल्याने भाविकांना अक्षरशः तारेवरची कसरत करत दर्शनासाठी जावे लागत आहे. या गंभीर परिस्थितीवर संताप व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) चे नगरपरिषद गटनेते तथा नगरसेवक नितीन भाऊ बागवाले यांनी नगरपरिषदेवर जोरदार टीका केली आहे.दररोज हजारो भाविक येणाऱ्या वैजनाथ मंदिरासमोर अशी घाणेरडी अवस्था ही नगरपरिषदेची अक्षम्य बेपर्वाई आहे, असे ठणकावून सांगत त्यांनी तातडीने नालीतील घाण पाण्याची योग्य विल्हेवाट लावून संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्याची मागणी भागवावे यांनी केली आहे.मुख्य रस्त्यावर साचलेले घाण पाणी, चिखल आणि कचऱ्यामुळे नागरिकांसह भाविक प्रचंड त्रस्त झाले असून, दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अल्प पावसातच नाली तुंबून रस्त्यावर घाण वाहत असेल, तर मुसळधार पावसात काय परिस्थिती होणार? असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.नगरपरिषद वेळेत जागी झाली नाही आणि तात्काळ उपाययोजना केल्या नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशाराही नितीनभाऊ बागवाले यांनी दिला आहे.



## वादळी कट्टा

### धुर्त राजकारणी

हातात झेंडा, जिभेवर साखर,
डोळ्यात मात्र सत्तेची भाकर,
मत मागताना आठवतो माणूस,
नंतर जनताच ठरते भारच.

भाषणात देश, भाषणात शेतकरी,
कार्यात मात्र नाते खिसेभरी,
प्रश्न विचारला की वळतो मुद्दा,
धुर्तपणाचा हाच खरा धंदा.

घोषणांचा पाऊस, कामांची दुष्काळ,
फाइलांवर झोपतो विकासाचा काळ,
फलक बदलले, चेहरे तेच,
फसवणुकीत पारंगत हा राजकीय वेश.

जनतेच्या नावावर सत्ता उभी,
सत्तेवर गेल्यावर जनता उपेक्षित ठेवी,
शिक्का पडतो, स्वप्न तुटते,
धुर्त राजकारणी पुन्हा निवडून येते

**संपादक अजय भांगे**



## परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या वतीने केज येथील पत्रकार धनंजय कुलकर्णी यांच्या निवासस्थानी संपन्न झाले. या प्रसंगी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली तसेच दिनदर्शिकेद्वारे सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास पुरोहित कल्याण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवास केजकर,पुरोहित कल्याण समितीचे मराठवाडा अध्यक्ष अनंत कोकीळ, समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे संस्थापक धनंजय कुलकर्णी,प्रदेश उपाध्यक्ष श्रीधर खोत, मराठवाडा अध्यक्ष चंद्रकांत पाटील तसेच प्रल्हाद देव यांची उपस्थिती होती.यावेळी उपस्थित मान्यवरांनी समाजहितासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. दिनदर्शिकेच्या माध्यमा तून समाजातील उपक्रम, सण–उत्सव व मार्गदर्शक माहिती सर्वांपर्यंत पोहोचेल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## १६ जानेवारी नंतर गाळपास येणाऱ्या उसाला भीमा पाटस २०० रु.जादा देणार:आ.राहुल कुल

दैनिक वादळ वार्ता

**पाटस(पुणे)। प्रतिनिधी**

एम.आर.एन.भीमा शुगर पॉवर प्रा.लि (निराणी शुगर्स लि.),पाटस, ता.दौंड या कारखान्याच्या गाळप हंगाम – २०२५ –२६ करिता येणाऱ्या प्रति टन उसाला ३१००/– पहिला हप्ता दिलेला आहे.

आता दि.१६ जानेवारीनंतर गाळपास येणाऱ्या उसाला प्रति टन २००/– अतिरिक्त अनुदान, म्हणजेच दि. १६ जानेवारीनंतर गाळपास येणाऱ्या उसाला प्रति टन ३३००/– ऊस दर देणार असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष आमदार अँड.राहुल कुल यांनी दिली आहे.हंगाम २०२५–२६ करिता आलेल्या उसाचा अंतिम दर दौंड तालुक्यातील इतर कारखान्यांच्या बरोबरीने देणार असल्याचे अँड.राहुल कुल यांनी आश्वस्त केले आहे. कारखान्याने दि.१२ जानेवारीपर्यंत ५४०८४८ मे.टन ऊस गाळप केले असून, ५३१०५०क्विंटल साखर उत्पादीत केली आहे. कारखान्याचा सरासरी साखर उतारा ११.३४% राखला आहे. कारखान्याच्या डिस्टीलरी प्रकल्पतून आतापर्यंत ८८४८६३ लिटर उच्च प्रतीचे इथेनॉल उत्पादीत केले असून २६७७३२१ लिटर रिक्टिफाईड स्पिरिट उत्पादीत केले आहे.सहवीज निर्मिती प्रकल्पतून आज अखेरीस २१७५९५३७ युनिट्स वीज निर्मिती केली असून १६७५८२३७ युनिट्स स्ववापर करून ५१८२२०० वीज निर्यात केली आहे.या वर्षी कारखान्याच्या इतिहासात प्रथमच एका दिवसात ११,००० मे.टन ऊस गाळप केले असल्याचे एमआर एन भीमाचे कार्यकारी संचालक रविकांत पाटील यांनी दिली आणि त्याच बरोबर कारखान्याच्या सभासदांनी आपल्या हक्काच्या कारखान्याला जास्तीत जास्त ऊस देऊन सहकार्य करावे असे आवाहन रविकांत पाटील यांनी केले आहे.

कारखान्याला ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचे, कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि युनियन पदाधिकाऱ्यांचे निराणी ग्रुप्स चे अध्यक्ष मुरुगेश निराणी, एक्झिक्युटीव्ह डायरेकटर संगमेश निराणी,ग्रुपचे कार्यकारी संचालक विजय निराणी संचालक विशाल निराणी यांनी आभार मानले.



# संपादकीय

## कुंकवाचं लेणं



लग्नसराईत नटण्याची हळदीला कोण घाई कुंकुमतिलकाने सौभाग्य वाणाची लयलूट होई. कुमारिका, सौभाग्यवती यांना देण्यात येणारं वाण संस्कृतीचा भाग झालं. पुढे जाऊन या वाण प्रथेने साहित्य आणि संस्कृतीवर आपली मोहोर उठवली. एका वाक्यात सांगायचं झालं तर, सवाष्ण वाणं म्हणजे सहज प्राप्त होणाऱ्या उपयुक्त गोष्टींचा साधक विचार. प्रापंचिक जीवनात वापरात येणाऱ्या तसचं गृहिणींना आनंद देणाऱ्या गृहोपयोगी वस्तू वा जिन्नस यांची लयलूट जी काळ्या-पांढऱ्या तिळावर गुळरूपाचा संस्कार करते. हवेत पडलेल्या गारव्याला थोडीशी ऊब मिळावी या हेतूने संस्कारित सण साजरा करताना हळदी-कुंकवाचं महत्त्व वाढतं. वर्षभराने येत असलेल्या सणाची पाळंमुळं जनमानसात मुरलेली असल्याने उसनं वाणं देण्या-घेण्याच्या प्रथा संस्कृतीला जिवंत ठेवतात. घरोघरच्या हळदी-कुंक घाटातला पहिला सौभाग्याचा मान सुवासिनींचा. विसरता न येण्यासारखा कुंकवाचा विषय महिलांसाठी हळव्या कोपऱ्यासारखा असतो. माथ्यावरचं भलंमोठं कुंकू धन्याची साक्ष देतं, त्याच्यावरचं प्रेम व्यक्त करतं. आपल्या धर्मात लहानपणापासून भाळी गंध लावली जात असल्याने मुलगा वा मुलगी गंध, नाम, बुक्का, कुंकू, चिरी, टिकल्या कपाळाची शोभा वाढवताना दिसतात. बाल्यावस्थेत काजळ, पावडर टिका, चंदन टिळा लावून सजवलं जातं. कुमारिका पूजल्या जातात. त्यांच्यावर संस्कार होतात. हळदी-कुंकवाची व्याख्या पसरते. मुली संस्कार विसरत नाहीत, नव्याने शिकत जातात. संस्कृतीतील महत्त्वाचा विधी आणि सामाजिक सोहळा असलेलं हळदी-कुंकू सौभाग्य-आरोग्य- समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक मानलं जातं. सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमातही कुंकू वापरलं जातं. त्याला सौभाग्याचं प्रतीक मानलं जातं ज्याने नकारात्मक ऊर्जा दूर सारली जाते. स्त्रियांच्या सौभाग्याचे रक्षण करता पतीच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना केली जाते. दुर्गादेवी आणि लक्ष्मीमातेची कृपा प्राप्त होण्यासाठी कुंकुमतिलकाने पूजा आराधना केली जाते. कुंकवाला पिंजर असंही संबोधलं जातं. धार्मिक बाबतीत, मंगल कार्यात कुंकवाचा वापर केला जातो. बालपणीच संस्कृतीचा ठेवा घेऊन आलेलं कुंकू म्हणजे कैक अनुभवाची पुंजी असते जी सासर माहेराला जोडणारा दुवा असते. आनंदाची आनंदाला भेट घडवण्यासाठी हळदी-कुंकवाचं प्रयोजन केलं जातं. देवतांना कुंकूमार्जन प्रिय असल्याने त्यांचा आशिष पाठीशी राहतो. असे मानले जाते की, ब्रह्मांडातील सुप्तशक्त जागी होऊन स्त्रियांच्या ठिकाणी लक्ष्मीतत्त्व जागृत होतात. कुंकवाची बोट मस्तकी लागताचं शक्ती संचारते. नकारात्मक ऊर्जा शोषली जाते. एकाग्रता वाढते, ज्यामुळे घर आणि कुटुंबाचं रक्षण होतं. बाईला बाईपण येतं. संस्कार संस्कृतीच्या छायेत पिढ्या शिकून मोठ्या होतात. आनंदाला पारावार उरत नाही. पदरात पडलेलं सौभाग्याचं दान शाश्वत लेणं होऊन सुखावतं.

कुंकवाचं स्थान अधोरेखित करताना बहिणाबाई म्हणतात...

लपे करमाची रेखा, माझ्या कुंकवाच्या खाली... पुशीसनी गेलं कुकू, रेखा उघडी पडली...

कपाल रेखा उघडी पडण्याचं दृर्भाग्य कुणालाही नको असतं. पण सत्याशी पाठ दाखवता येत नाही हेचं खरं. कुंकवाचं लेण म्हणजे सौभाग्याचं लेणं. ज्यात स्त्रीच्या सौभाग्याचे प्रतीक मानले जाणारे दागिने, मंगळसूत्र, बांगड्या, कुंकू, जोडवी पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि कुटुंबाच्या समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण मानले जातात. यात मंगळसूत्र सर्वात श्रेष्ठ मानले जाते.

याच दिवशी संस्कृती, परंपरा जोपासणारे सण चैतन्य घेऊन येतात. चैतन्याची ज्योत कायम तेवत ठेवण्याच्या वचनात इतरांना सणाचा आनंद देतो. तिळाचा गोडवा कायम राखणारे आशेचे पतंग भरारी घेण्याची स्वप्न पाहतात. मनात वृद्धिंगत होणारा दीपोत्सव कायम उजळत राहावा या हेतूने नववर्षाच्या प्रारंभी आलेला सण घरादारावरची जळमटं दूर सारतो. सूर्याचा मकर राशीतला प्रवेश म्हणजे सण दाराशी आल्याचा सांगावा. हिवाळ्यातल्या गुलाबी दिवसाची ऊबदार रजईतली झोप अनिवार होते. पित-केशरी तांबड फुटण्यापूर्वी, कोंबड्याने बांग देण्याआधी आसमंत दवात नाहतो. शीत वारे दारखिडक्यांच्या फटीतून डोकावतात. पक्षी किलबिलाटाने सभोवती निसर्गमय शाळा सुरू होते. सौर कालगणनेशी संबंधित संक्रांतीपासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. पौष महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. दिवस मोठा रात्र लहान होत जाते. हंगामात उष्णता वर्धक हरभरे, गहू लोंबे, ऊस, तीळ, मटार, बोरं धान्याची शेती झाल्याने गरजेनुसार आदान-प्रदान होते. माती तत्त्वाने भरलेल्या सुगडाची हरभरा, तीळगूळ, ऊस, बोराने पूजा बांधली जाते. मानाची, पानाची, दानाची परंपरा जोपासताना काळ्या रंगाचे महत्त्व अबाधित असल्याने तीळगूळ घ्या, गोड गोड बोला, आमचा तीळ सांडू नका आमच्याशी भांडू नका अशा संदेशाचा, सामाजिक सद्भावना वाढवणारा आणि सद्विचारांचे आदान प्रदान करणारा सण भारतीय परंपरेचा आरसा दाखवतो. आजचा दिवस उत्साहाने साजरा करायचा. वायुवेगे वाहणाऱ्या वाऱ्याला पतंगाच्या साथीने उडवण्याचा, विविधांगी रंग जनमानसात पसरविण्याचा. मनरूपी पतंग आकाशात भिरभिरवण्याचा.खेळाशी मेळ साधत आलेला दिवस चांगुलपणाने जपण्याचा. शेक्सपियरच्या मते माणसाच्या हृदयात उगम पावलेला चांगुलपणा त्याच्यानंतर मागे उरतो. दिव्याचा प्रकाश लांबवर पसरतो तसे चांगुलपणाची किर्ती दूरवर पसरते. कारण तेव्हा तुम्ही इतरांशी आणि स्वत:शी उत्तम वागलेले असता. आनंदाचं दुसरं नाव उत्तम वागणं आहे, जेणेकरून जेवढं मन उत्साही आणि आनंदी तेवढा तुमचा पतंग आकाशाला गवसणी घालण्याचा संकल्प बांधणारा ठरेल. शरीराला जशी आरामाची गरज असते तशीचं मनाला चैतन्याची गरज असते. हळदी-कुंकवाच्या निमित्ताने एकत्र येऊन नाती वृद्धिंगत करता येतात. सद्भावना वाढवता येते. मैत्रैय कायम राखता येते. तीळगुळाची गोडी आधी मनात मग नात्यात पेरता आली की मन पाखरांचे थवे बनून स्वैर मोकळ्या आकाशात स्वच्छंदी विहारायला मुक्त होतं, हीच या सणांची जादू आहे.

# विद्यापीठ नामांतराच्या आठवणी अर्थात आंदोलनातील फसलेला प्लॅन

१९९३ चे वर्ष असेल त्यावेळी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करण्याच्या मागणीसाठी परभणीच्या गौतम वाघमारे यांनी स्वतः चिता पेटवून त्यात आत्मदहन करुन स्वत:ला पेटवून घेत जीवाचे बलिदान.दिले होते. त्यामुळे राज्यात नामांतर करण्याच्या मागणीसाठी मोर्चे आणि आंदोलने होत होती. त्यावेळी मी गौतम बचुटे, संतोष बचुटे, ज्योतिराम बचुटे, भीमा बचुटे, सतीश बचुटे कळंब येथील ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात शिक्षण घेत होतो. त्यावेळी मला चळवळीची आणि दलित पँथर व रामदास आठवले यांचे तीव्र आकर्षण होते. तसेच बाबुराव पोटभरे, पप्पू कागदे यांच्या सोबत आम्ही केज तालुक्यात संदीपान हजारे, मारुती वाघमारे, गोवर्धन वाघमारे, भास्कर मस्के, देविदास डोंगरे, अंबादास तुपारे, आश्रुबा तुपारे, विकास मस्के आणि रवी जोगदंड यांच्या सोबत चळवळीत काम करीत होतो. तसेच आम्ही त्यावेळी आमच्या गावातील नानाभाऊ सरवदे, केशव बचुटे, गायसमुद्रे गुरुजी, मस्के गुरुजी, माझे वडील लिंबाजी बचुटे, चुलते सखाराम बचुटे, नामांतराच्या सत्याग्रहात नाशिकच्या जेलमध्ये अटक असलेले मोठे भाऊ रावसाहेब बचुटे आणि मेव्हणे कॉ. बाबासाहेब सरवदे, संभाजी सरवदे, अभिमान सरवदे, व्यंकट सरवदे, वसंत बचुटे, छगन बचुटे, अभिमान सरवदे, शाहू बचुटे, भारत मस्के, शिरीष मस्के, विजय बचुटे यांच्या कडून पूर्वीची माहिती ऐकून घेत होतो.

सन ११९३ मध्ये नामांतरांचे वातावरण तापले होते. अनेक ठिकाणी मोर्चे आणि आंदोलने होत होती. आम्ही त्यावेळी महाविद्यालयात शिक्षण घेत असल्याने आणि त्यावेळी राज्यात कुठे काही घडले की, मी आणि आमचे सहकारी हे साळेगाव येथे रस्ता रोको करीत असू. त्यावेळी अनेकजण म्हणत की, कुठेही दलित अन्याय अत्याचाराच्या घटना घडली की, जिल्ह्यात पहिली प्रतिक्रिया साळेगावला उमटते.

त्यावेळी आम्ही शिकत असलेले सर्वजण रात्री आमच्या समाज मंदिराच्या स्लॅबवर आणि काहीजण समाज मंदिरात झोपत होतो. असेच आम्ही सर्वजण रात्री समाज मंदिरात जमा झालो आणि ठरविले की, नामांतरासाठी आज रात्री दीड ते दोन वाजता आपण सर्वांनी केजकडून कळंबकडे जाणारी एसटी अडवून त्यातील सर्व प्रवासी खाली उतरल्या नंतर गाडी पेटवून सरकारला इशारा देण्याचा प्लॅन आखला.

त्यावेळी मी गौतम बचुटे, संतोष बचुटे, ज्योतिराम बचुटे, भीमा बचुटे, सतीश बचुटे महादेव सरवदे, कैलास सरवदे, बलभीम बचुटे, विजय सरवदे, छबू मास्तर, राजा बचुटे, अनिल गायसमुद्रे, भारत बचुटे, जालिंदर सरवदे, राजा सरवदे आणि अनेक आम्ही गावा पासून सुमारे दीड कीमी अंतरावर निर्मनुष्य ठिकाणी गाडी अडविण्यासाठी गेलो. सोबत डिझेल टाकी फोडण्यासाठी लोखंडी पहार, गज आणि जुने कपडे व काही चिंध्या असे साहित्य सोबत घेऊन २० ते २५ जणांचे टोळके गेलो. रस्त्यावर लावलेला एक लोखंडी बोर्डाची पाटी वाकवून रस्त्यावर आडवी लावली आणि रस्त्यावर मोठमोठे दगड टाकून रस्ता बंद केला आणि तेवढ्या रात्री गाडी येण्याची वाट पहात आम्ही रोडच्या कडेला असलेल्या खड्ड्यात लपून दबा धरून बसलो. आमचा प्लॅन असा होता की, गाडी रस्ता नसल्याने ड्रायव्हरने गाडी थांबली की, आम्ही सर्वांनी अचानक समोर जाऊन प्रवाशांना खाली उतरायचे आणि डिझेल टाकी फोडून त्यातील डिझेल मध्ये कपडे बुडवून ते एसटीत टाकून गाडीला आग लावायची व पळून जायचे. थोड्या वेळात आम्हला केजकडून एक वाहन येत असल्याचा उजेड दिसला. आम्ही सर्व आंदोलक सावध झालो. प्रत्येकाने मनात आपल्याला कराचे काम याची उजळणी केली आणि श्वास रोखून गाडी येण्याची वाट पहात पोझिशन घेतली. गाडी जवळ आली. आम्हाला वाटले आता करकचून ब्रेक लावून गती कमी करून गाडी थांबेल ; परंतु त्या गाडीच्या ड्रायव्हरला धोक्याचा अंदाज आला असावा. त्याने गाडीची गती थोडी सुध्दा कमी न करता गाडीची गती वाढवून त्या मोठ्या दगडांच्या अडथळ्या वरून गाडी तशीच पुढे कळंबच्या दिशेने भरधाव वेगात घेऊन गेला. नंतर आम्ही मात्र प्लॅन फसला म्हणून निराश झालो. आता पुढे काय ? म्हणून एकमेकांत चर्चा करीत होतो. काहीजण म्हणाले आता आनखी एखादी गाडी अडवून आपण ती पेटवू पण पोलिस आणि आंदोलन याची माहिती असल्याने पुढचा धोका ओळखून मी आता आपण परत जाऊ असे म्हणून आडमार्गाने परत फिरण्याचा सल्ला दिला. तो सर्व आंदोलकांनी ऐकला. आम्ही त्या अंधारात पुन्हा परत येऊन समाज मंदिराच्या स्लॅबवर बसून रोडकडे पहात बसलो. इकडे पुढे गेल्या नंतर त्या गाडीच्या ड्रायव्हरने माळेगांव चौकात असलेल्या युसुफवडगाव पोलिस ठाण्याच्या चौकीला कल्पना दिली. पोलिसांनी वायरलेसद्वारे केज पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली. त्या नंतर थोड्याच वेळात सायरन वाजवीत पोलिसांची गाडी आली. आम्ही हे सर्व लांबून पाहत होतो. पोलिसांनी रोडवरचे आम्ही टाकलेले दगड हटवून रस्ता खुला केला.

आम्ही पुन्हा रात्रभर जागी राहून हळू आवाजात एकमेकांशी चर्चा करीत होतो. तसेच जरी आपला एसटी पेटवून विद्यापीठ नामांतर आंदोलन अयशस्वी झाल्याचे दुःख आणि सल मनात होती तरी आम्ही पोलिसांच्या हाती लागलो नाहीत. म्हणून आपला नामांतर आंदोलनाचा प्लॅन अर्धवट यशस्वी झाल्याचा आनंद देखील होता.

नंतर सकाळी आम्ही बस स्टँडवर आल्यास पुन्हा सकाळी पोलिस आले. आम्ही मात्र आम्ही त्या गावचे नव्हे असा आव आणून पोलिसांशी चर्चा करीत होतो. त्यावेळी आम्हाला पोलिस म्हणाले की, रात्री कुणी तरी रस्त्यावर दगड टाकून रस्ता अडविला होता. त्याचा तपास सुरू आहे. ही माहिती ऐकून मनात एक प्लॅन फसला तरी बाबासाहेबांच्या नावासाठी विद्यापीठ नामांतर आंदोलनात असलेला सहभाग यामुळे मात्र मान ताठ झाल्याचे समाधान होते.




**-पँथर पत्रकार गौतम बुचुटे**

# मोबाईल फोन आणि लॅपटॉपमुळे होतोय परिणाम? या ३ सवयी लगेच दूर करा

दैनिक वादळ वार्ता

मोबाईल फोन आणि लॅपटॉप आज आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. काम, अभ्यास, मनोरंजन आणि सोशल मीडियापासून ते सर्व गोष्टींसाठी स्क्रीनचा वापर वाढला आहे. मोबाईल फोनकडे जास्त वेळ पाहिल्याने किंवा लॅपटॉपवर जास्त वेळ काम केल्याने मानेवर आणि डोळ्यांवर सतत ताण येतो. यामुळे मान कडक होणे, वेदना होणे आणि डोळ्यांमध्ये जळजळ किंवा जडपणा येऊ शकतो. सुरुवातीला बरेच लोक ही एक किरकोळ समस्या म्हणून दुर्लक्ष करतात, परंतु कालांतराने ही समस्या आणखी वाढू शकते. म्हणून काही सवयी सुधारणे महत्वाचे आहे.सतत स्क्रीनकडे पाहत राहिल्याने झोपेवरही परिणाम होतो आणि डोकेदुखी होऊ शकते. जर हे दुखणे वेळेवर कमी झाले नाही तर हे दुखणे दैनंदिन जीवनावर परिणाम करू शकते. हे टाळण्यासाठी कोणत्या सवयी सुधारल्या पाहिजेत ते पाहूया.मान आणि डोळे दुखणे टाळण्यासाठी कोणत्या सवयी बदलल्या पाहिजेत?: लेडी हार्डिंग हॉस्पिटलचे डॉ. एल.एच. घोटकर स्पष्ट करतात की, मान आणि डोळे दुखणे टाळण्यासाठी, प्रथम तुमच्या स्क्रीन पाहण्याच्या सवयी बदलणे आवश्यक आहे. मोबाईल फोन किंवा लॅपटॉप वापरताना योग्य पोश्चर ठेवा आणि जास्त वाकणे टाळा. तासन्तास स्क्रीनकडे पाहणे टाळा; वारंवार ब्रेक घ्या. तुमच्या डोळ्यांना थोडा आराम



देण्यासाठी स्क्रीनची चमक संतुलित करा.

फोन डोळ्यांजवळ खूप ठेवण्याची सवय हानिकारक ठरू शकते. शिवाय, काम करताना खुर्ची आणि टेबलाची उंची योग्य असली पाहिजे. वाईट सवयी दीर्घकाळात वेदना वाढवू शकतात. म्हणून, त्या त्वरित दुरुस्त करणे महत्वाचे आहे. दुर्लक्ष केल्यास कोणते आजार होण्याचा धोका असतो?: जर मान आणि डोळ्यांच्या दुखण्याकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केले तर त्यामुळे गंभीर समस्या उद्भवू शकतात. गर्भाशयाच्या मुखात वेदना, स्नायूंमध्ये उबळ आणि पाठीच्या कण्याच्या समस्या वाढू शकतात. दृष्टीदोष, कोरड्या डोळ्यांचा सिंड्रोम आणि सतत डोकेदुखी देखील होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, झोपेचा अभाव आणि वाढता ताण मानसिक आरोग्यावर देखील परिणाम करू शकतो. या सवयी देखील अंगीकारा: दर २० मिनिटांनी डोळ्यांना विश्रांती द्या. मोबाईल फोन वापरताना सुरक्षित अंतर ठेवा. मानेचे आणि डोळ्यांचे हलके व्यायाम करा. स्क्रीन टाइम मर्यादित करा. झोपण्यापूर्वी मोबाईल फोनचा वापर कमीत कमी करा.

# श्री गुरु तेग बहादुर- 'हिंद दी चादर'

दैनिक वादळ वार्ता

श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ - नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.एप्रिल १६२१ मध्ये अमृतसरमध्ये श्री गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरू हरगोबिंद आणि माता गुजरी यांच्या कुटुंबात झाला. १६६४ मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरु पदवी प्राप्त झाली होती. गुरू तेग बहादूर यांचे मूळ नाव त्यागमल होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना तेग बहादूर म्हणजेच तलवारीसारखा धैर्यवान हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक




असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा देत असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत, ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले.

मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरूतेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२ मध्ये त्यांची ४०० वी जयंती देशभर साजरी केली होती.त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

'जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै,<br>
सुख सनेहु अरू भय नहीं जा कै, कांचन माटी मानै,<br>
लोभ मोह अभिमान न ता कै, हरख सोग नहीं जा कै<br>
जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै'

म्हणजेच जो मनुष्य दु:खात असला तरी दु:खी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत.त्यांच्या शहीद समागमास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अल्पसंख्यांक विभाग आणि श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.नुकत्याच या कार्यक्रमांच्या आयोजनानिमित्त कार्यशाळा घेण्यात आली होती. यावेळी 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब' यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेनिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले होते आणि हा कार्यक्रम जनमानसांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करीत आहे. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी आहे. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

# साकळाई पाणी योजनेच्या माध्यमातून लाभक्षेत्रातील गावे दुष्काळमुक्त करणार-पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

## सारोळा कासार येथे सुमारे ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

साकळाई पाणी योजनेच्या कामाची सुरुवात येत्या पंधरा दिवसात करण्यात येईल. या पाणी योजनेच्या माध्यमातून लाभक्षेत्रातील गावांना दुष्काळमुक्त करण्यात येईल, अशी ग्वाही जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.अहिल्यानगर तालुक्यातील सारोळा कासार येथे सुमारे ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास दिलीप भालसिंग, उद्योजक दिलीप दाते, सरपंच सौ. आरती कडूस, रविंद्र कडूस, सौ. योगिता निंभोरे, किरण साळवे, संतोष खोबरे, दादाभाऊ चितळकर, रंगनाथ निमसे आदी उपस्थित होते.पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, या भागातील लोकांना अनेक वर्षे पाण्याची प्रतीक्षा करावी लागली. साकळाईच्या सर्व कामांना शासनाने मंजुरी दिली असून, पुढील पंधरा दिवसांत कामाला सुरुवात करण्याच्या सूचना विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. साकळाईच्या कामामुळे सारोळा कासार येथील २९५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन १३ बंधाऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.केंद्र सरकारने नव्याने आणलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक गावाला निधी उपलब्ध होत असून, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या विकासाचे नियोजन करताना रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ विविध समाजघटकांना मिळत आहे. सुरू केलेली एकही योजना बंद नाही. कोविडनंतर सुरू झालेल्या मोफत धान्य योजनेची मुदत वाढविण्यात आली असून, 'लाडकी बहीण' योजनाही सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले, कुकडी कालव्याच्या कामांना ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून, कालव्याची कामे मार्गी लागल्यानंतर आवर्तनाचा चाळीस दिवसांचा कालावधी कमी होईल. शेवटच्या गावाला पाणी मिळावे म्हणून पाईपलाईनद्वारे पाणी देण्याचा विचार जलसंपदा विभाग करीत आहे. जिल्ह्यात रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली येत असलेल्या गुंतवणुकीचा फायदा जिल्ह्याला कसा होईल, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संरक्षण उत्पादनाचे केंद्र म्हणून आपला जिल्हा नावारूपाला येईल. दळणवळणाची साधने उपलब्ध होत आहेत. छत्रपती संभाजीनगर - पुणे ग्रीन फिल्ड मार्ग होत आहे. जिल्हा मोठ्या औद्योगिक नगरांना जोडला जात असल्याने, जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचे काम युवकांच्या भवितव्याच्या दृष्टीने करायचे आहे. असेही त्यांनी सांगितले.घोसपुरी येथे माजी सैनिकांनी उभारलेल्या कमानीचे लोकार्पणही मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सैनिकांच्या त्यागाला समाज विसरून जातो, अशी खंत व्यक्त करून 'राष्ट्र प्रथम' ही भावना असली पाहिजे, असे ते म्हणाले. जिल्ह्यातील सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, अकोला जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या स्मारकाप्रमाणे आपल्या जिल्ह्यातही स्मारक उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.



# नांदेड येथील ऐतिहासिक 'हिंद दी चादर' कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून अनुयायांची उपस्थिती

## ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जय्यत तयारी; प्रशासनाकडून चोख नियोजन

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित भव्य कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून शीख, बंजारा, सिंधी व इतर समाजातील अनुयायी उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून भाविकांच्या सोयीसाठी चोख नियोजन करण्यात आले आहे.




नांदेड येथील मोदी मैदान येथे हा मुख्य सोहळा पार पडणार आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समिती आणि विविध समाज बांधवांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हा प्रशासनाने या सोहळ्याची व्यापक तयारी केली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी २५ विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी निवास, भोजन, आरोग्य व वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यात आली आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविकांसाठी शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागांवर निवासाची सोय करण्यात आली असून, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी विशेष वाहनतळ (पार्किंग) व्यवस्था उभारण्यात आली आहे.

या सोहळ्याचे महत्त्व लक्षात घेऊन, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्याग व बलिदानाचा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांनी व अनुयायांनी या ऐतिहासिक कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### स्वीप समितीच्या वतीने 'मनपा ऑन एअर' उपक्रम

# विविध रेडिओ वाहिन्यांवरून प्रेरक मुलाखती व संदेश प्रसारित

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदारांमध्ये जनजागृती व्हावी आणि मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने अहिल्यानगर मनपा स्वीप समितीच्या वतीने 'मनपा ऑन एअर' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निवडणूक प्रक्रियेत योगदान देणारे विविध अधिकारी, मान्यवर व्यक्ती आणि संस्थांच्या प्रतिनिधींच्या प्रेरक मुलाखती व शुभेच्छा संदेश विविध रेडिओ वाहिन्यांवरून प्रसारित केले जात आहेत. रेडिओच्या माध्यमातून घराघरांत सकारात्मक संदेश पोहोचत असल्याने मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत आहे. अहिल्यानगर आकाशवाणी, रेडिओ नगर, रेडिओ आशा, रेडिओ सिटी, बिग एफएम,




रेडिओ ऑरेंज तसेच विविध कम्युनिटी रेडिओ सेंटर्सवरून हे प्रसारण सुरू आहे. यात निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे, प्रक्रियेतील विविध अधिकारी, जिल्हा मतदारदूत डॉ. अमोल बागुल, तसेच उपक्रमात सहभागी सिनेअभिनेते, कलाकार, मतदार समन्वयक, स्वयंसेवक आणि स्वीप धुरंधर यांच्या निवडणूक प्रक्रियेविषयीच्या मुलाखती, शुभेच्छा संदेश आणि जिंगल्स प्रसारित करण्यात येत आहेत.या उपक्रमासाठी आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख सुदाम बटुळे, रेडिओ नगरचे संचालक भूषण देशमुख, तसेच आरजे प्रसन्न, धनेश खत्ती, सचिन जगताप, तन्मय जयस्वाल, राधिका कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, स्वीप नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, मेहेर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

# ज्येष्ठ भाजप नेते खासदार नारायण राणे यांनी मिश्रा यांना विकासाभिमुख प्रतिनिधी म्हणून गौरविले

## युवा आयकॉन व बिहार आमदार मैथिली ठाकूर यांनी मुंबईच्या विकासासाठी मतदारांना मिश्रा यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

माजी केंद्रीय मंत्री व ज्येष्ठ भाजप नेते खासदार नारायण राणे, तसेच बिहारच्या आमदार व युवा आयकॉन मैथिली ठाकूर यांनी रविवारी प्रभाग क्र. ४३ मधील भाजप उमेदवार विनोद मिश्रा यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

कुरार गाव, मालाड (पूर्व) येथे झालेल्या सभेला संबोधित करताना खासदार नारायण राणे म्हणाले, मिश्रा हे गेल्या दहा वर्षांपासून सर्वात सहज उपलब्ध आणि विकासाभिमुख प्रतिनिधी आहेत. मिश्रा हे खरे मुंबईकर असून त्यांनी नेहमीच गरीब व गरजूंसाठी काम केले आहे. त्यांनी या भागात अनेक विकासकामे केली आहेत आणि मला खात्री आहे की येत्या कार्यकाळात उर्वरित कामे पूर्ण करतील. मी सर्वांना आवाहन करतो की त्यांना विक्रमी मतांनी पुन्हा निवडून द्या.

आमदार मैथिली ठाकूर यांनीही रहिवाशांना मिश्रा यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले. मुंबईचा विकास हा विकासाभिमुख नेत्यांना निवडून दिल्याशिवाय शक्य नाही.



त्यासाठी विनोद मिश्रा यांसारखे प्रतिनिधी आवश्यक आहेत. ते आपल्या भागाचा विकास सुनिश्चित करतील. समर्थकांचे आभार मानताना विनोद मिश्रा म्हणाले, लोक धर्माच्या आधारावर मतदान करत नाहीत. ते केलेल्या कामाच्या आधारावर मतदान करतात. मला पाठिंबा व आशीर्वाद देण्यासाठी आलेल्या सर्वांचा मी आभारी आहे.मिश्रा यांना मराठी, उत्तर भारतीय, मुस्लिम अशा सर्व समाजघटकांकडून पाठिंबा मिळत आहे

# भाजपच्या कमिशनखोरीमुळे चंद्रपूर शहराचा विकास खुंटला-वडेट्टीवार

## चंद्रपूर महापालिका निवडणुकीत वडेट्टीवार यांचा प्रचाराचा धडाका

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

कोट्यावधींचा विकास निधी आणला असा खोटा प्रचार करून भाजप जनतेची दिशाभूल करत आहे. तर चंद्रपूर महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांच्या कमिशन खोरीमुळे चंद्रपूर शहराचा विकास खुंटला म्हणूनच येणाऱ्या निवडणुकीत या कमिशनखोरांना सत्तेतून बेदखल करा अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.चंद्रपूर येथील प्रभाग ७ जटपुरा येथे काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ आज जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.सभेत बोलताना विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपचे वाद, जातीयवाद आणि राज्याची आर्थिक स्थिती डबघाईला सर्वस्वी जबाबदार असलेल्या भाजपची पोलखोल केली. आज संपूर्ण देशात व राज्यात महागाई व बेरोजगारीमुळे जनता त्रस्त झाली असून सर्वसामान्यांचे जगणे अवघड झाल्याचेही टीका त्यांनी यावेळी केली. तर काँग्रेस काळामध्ये सर्वसामान्य जनतेला न्याय आणि हक्क व त्याच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यात येत होती. मात्र भाजपने अमृत नळ योजना व भूमिकत गटार योजनेतून कमिशन खोरी केल्याने आज जनतेला पिण्यासाठी शुद्ध पाणी सुद्धा मिळत नाही. सोबतच शहरातले अंतर्गत रस्त्यांची दुर्दशा व सर्वसामान्य नागरिकांचे हाल याला सर्वस्वी जबाबदार भाजप सरकार असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली.विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की ,काँग्रेस पक्षाने चंद्रपूर शहराच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले असून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेसचे सर्व उमेदवार हे कटिबद्ध असतील. भाजपाच्या अपयशी धोरणांवर टीका करत त्यांनी महागाई, बेरोजगारी, नागरी मूलभूत सुविधांचा अभाव याबाबत सत्ताधाऱ्यांना जाब विचारला.चंद्रपूर शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण या मूलभूत सुविधांसाठी काँग्रेसचे उमेदवार विजयी करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी मतदारांना काँग्रेसच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विनायक बांगडे, प्रवीण पडवेकर, जुनेद खान कुणाल सहारे वैद्य तसेच जेटपुरा प्रभाग क्रमांक सातचे उमेदवार अश्विनी खोब्रागडे ,मीनाक्षी गुजरकर, मनोज वासेकर, इंजि. रमिज शेख आणिस्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

# राजकारणाच्या स्टेजवरून धर्माच्या गोष्टी किंवा घोषणा दिले जाऊ नये-इमरान प्रतापगडी

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

देश प्रेम सद्भावना आणि एकतेच्या बळावर उभा आहे. परंतु सध्याचे सत्ताधारी प्रत्येक ठिकाणी द्वेष, नफरत आणि समाजात फूट पाडणारी भाषा वापरून लोकांना विभागण्याचे काम करत आहेत. राजकारणाच्या स्टेजवरून धर्माच्या गोष्टी किंवा घोषणा दिले जाऊ नये.असे नमुद करत ते म्हणाले की, अशा परिस्थितीत काँग्रेस पक्षच असा आहे जो समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन चालत असून, देशात भाईचारा आणि सद्भावना वाढविण्याचे कार्य प्रामाणिकपणे करत आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार इम्रान प्रतापगडी यांनी केले.ते मुकुंदनगर येथील सीआयव्ही मैदानावर काँग्रेस व महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत बोलत होते.

खासदार प्रतापगडी म्हणाले की, ही निवडणूक शहराच्या विकासाची आहे, स्थानिक प्रश्नांची आहे. मात्र दुर्दैवाने इतर पक्षांचे नेते राष्ट्रीय स्तरावरील मुद्दे पुढे करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. शहराच्या पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार




यांसारख्या मूलभूत प्रश्नांपासून जनतेचे लक्ष हटवणे हे अत्यंत दुर्दैवी असून, यावर जनतेने गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे.ते म्हणाले, जनतेने अशा प्रकारच्या द्वेशाच्या राजकारणाला बळी पडू नये. नगर शहराच्या विकासासाठी जर स्थानिक आमदार किंवा सत्ताधाऱ्यांनी निधी दिला नाही, तर मी माझ्या खासदार निधीतून विकासकामांसाठी मदत करीन. एवढेच नव्हे तर इतर खासदारांचे निधीही नगर शहरासाठी मिळवून देण्याची ग्वाही मी आपल्याला देतो असे सांगितले.

मुस्लिम समाजाच्या नेतृत्वाबाबत बोलताना खासदार इम्रान प्रतापगडी म्हणाले, देशात अनेक ठिकाणी एमआयएममुळे मुस्लिम समाजाचे मोठे नुकसान होत आहे. समाजाचे तथाकथित हितचिंतक असल्याचे भासवून, जिथे जिथे समाजाचे नेतृत्व मजबूत आहे तिथे जाऊन त्या नेतृत्वाची ताकद कमी करण्याचे काम एमआयएमकडून केले जाते. परिणामी समाजातील प्रबळ नेत्यांचा पराभव होतो आणि त्याचा थेट फटका समाजाच्या प्रगतीला बसतो. ही बाब आज समाजासमोर स्पष्ट पुराव्यांसह आली आहे.पतंग जरी पक्षाचे आहे पण त्याचा मांजा हा सताधार्यांचा आहे हे समाजाने समजुन घ्यायला हवे.

काँग्रेस पक्षा बद्दल बोलताना सांगितले की,हा पक्ष केवळ एका समाजाचा नाही, तर सर्व समाजांचा पक्ष आहे. दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्याक, शेतकरी, कामगार, व्यापारी आणि युवक-युवती यांना न्याय देणारा पक्ष म्हणजे काँग्रेस. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत काँग्रेस व महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा.

यावेळी त्यांनी मुकुंदनगर मधील उमेदवार शेख नसीम खानसाहेब,शेख फैयाज अजीजोद्दीन, खान मिनाज जफर (खान बाबा),शम्स हाजी समीर खान व शहरातील काँग्रेस व महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांच्या विजयासाठी नागरिकांना एकजूट होण्याचे आवाहन केले. या जाहीर सभेस काँग्रेसचे दिप चव्हाण, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, माजी महापौर अभिषेक कळमकर, काँग्रेसचे नेते सय्यद खलील, फिरोज खान, निसार बागवान, माजी नगरसेवक संजय झिंजे, शिवसेना (उबाठा)चे किरण काळे, मनोज गुंदेचा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे अतहर खान तसेच महाविकास आघाडीचे अनेक नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जाहीर सभेत हजारोच्या संख्येने लोकांनी उपस्थिती दर्शविली.

# सातपुड्याच्या कुशीत भीषण अग्निकांड! अक्कलकुवा तालुक्यातील चार घरे जळून खाक;२० लाखांचा संसार राख

## पाडवी कुटुंबावर आभाळ फाटले; दुर्गम भागातील आर्त हाकेला सरकार साद देणार का?

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी मोलगी**

निसर्गाच्या सानिध्यात आणि सातपुड्याच्या अतिदुर्गम दऱ्याखोऱ्यात वसलेल्या अक्कलकुवा तालुक्यातील बर्डी येथील दुधलीपादरपाडा येथे रविवारी सायंकाळी भीषण आग लागली. या आगीत एकाच कुटुंबातील बाप-लेकांची चार लाकडी घरे जळून खाक झाली असून, अंदाजे १८ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. ऐन थंडीच्या दिवसात या आदिवासी कुटुंबांचा संसार उघड्यावर आला असून, शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी परिसरातून होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवार, ११ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास संमसा मिठ्या पाडवी, गोरा संमसा पाडवी, अनिल संमसा पाडवी आणि विलास संमसा पाडवी या चौघांची घरे एकापाठोपाठ एक अशा रांगेत होती. ही सर्व घरे लाकडी आणि कौलारू स्वरूपाची होती. सायंकाळच्या वेळी घरातील सदस्य बाहेर असताना अचानक एका घराला आग लागली. वाऱ्याचा वेग जास्त असल्याने आगीच्या ज्वाळांनी क्षणार्धात रौद्र रूप धारण केले आणि बाजूची इतर तीन घरेही कचाट्यात घेतली. घराच्या जवळच शेतात एक महिला आपल्या चिमुकल्या मुलासह बसली होती. तिला घरांतून आगीचे लोळ बाहेर येताना दिसताच तिने मदतीसाठी मोठा आरडाओरड केला. मात्र, वस्ती दुर्गम भागात असल्याने आणि आगीची तीव्रता प्रचंड असल्याने ग्रामस्थ काहीही करू शकले नाहीत. बघता बघता डोळ्यादेखत आयुष्यभराची पुंजी आणि धान्य-साठा जळून राख झाला. सुदैवाने, घरात कोणीही नसल्याने मोठी जीवितहानी टळली आहे.

या घटनेची माहिती मिळताच पिंपळखुटा सजाचे ग्राम महसूल अधिकारी राहुल धनसिंग पावरा यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत नुकसानीचा रितसर पंचनामा केला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, घरातील अन्नधान्य, कपडे, दागदागिने आणि शेतीचे साहित्य जळून अंदाजे १८ ते २० लाखांचे नुकसान झाले आहे. आमचं सगळं संपलं, आता राहायचं कुठं आणि खायचं काय? असा प्रश्न पाडवी कुटुंबासमोर उभा ठाकला आहे. या अतिदुर्गम भागातील कुटुंबांना जिल्हा प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने विशेष बाब म्हणून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.



# केज येथील भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज येथील भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ हनुमंत सौदागर,प्रमुख पाहुणे,प्रा श्रीकांत लुंगारे, हे होते. पुढे बोलताना म्हणाले की केले की, १४ जानेवारी हा दिवस महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासातील सुवर्णक्षण आहे. अनेक वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर विद्यापीठाला महामानवाचे नाव मिळाले, हा विजय समतावादी विचारांचा होता. यासाठी अनेकांना आपल्या जीवाचे समर्पण करावे लागले. विद्यापीठाला ज्ञानसूर्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्याने तो विद्यापीठाचा बहुमान झाला असे म्हणता येईल.डॉ बाबासाहेबांना अपेक्षित असणाऱ्या शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान ग्रहण करून त्या ज्ञानाचा वापर मानव कल्याणासाठी झाला पाहिजे . डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून शिक्षण घेऊन जगभर नाव कावणार विद्यार्थी घडले आहेत ग्रामीण भागासाठी हे विद्यापीठ ज्ञानगंगा ठरले आहे असे मत व्यक्त केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा बलाढये यु बी ,प्रा कचरे जे एस,प्रा जगदाळे एम एच,प्रा चोले एन जे ,ग्रंथपाल संतोष साळवी सुजीत नाईकवाडे,वामन चिगुरे यांनी परिश्रम घेतले.



# नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांचा सत्कार

## ह.भ.प.प्रभाकर महाराज झोलकर यांची उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

नाथ शिक्षण संस्थाच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त नाथ शिक्षण संस्थाचे सह सचिव प्रदीप खाडे यांनी शाल, फेटा बांधून, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवत सत्कार केला. ह. भ. प. प्रभाकर महाराज झोलकर व उद्योजक सुरेश नाना फड यांची उपस्थिती होती. तसेच सर्वांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

शहरातील विद्यानगर येथील निवृत्तीनाथ निवास येथे बुधवार दि. १४ जानेवारी रोजी नाथ शिक्षण संस्थाच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी नाथ शिक्षण संस्थाचे सह सचिव प्रदीप खाडे यांच्या हस्ते शाल, फेटा बांधून, श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवुन सत्कार करण्यात आला. वाढदिवस अभिष्टचिंतनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांकडूनही सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांच्यावर दिवसभर शुभेच्छांचा वर्षाव झाला. यावेळी ह. भ. प. प्रभाकर महाराज झोलकर, नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदिप खाडे व उद्योजक सुरेश नाना फड, सामाजिक कार्यकर्ते माधवराव प्रभाकरराव दहिफळे, पंचायत समितीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी निळकंठ दराडे, आदर्श शिक्षक अंकुश फड, राजाभाऊ होळंबे, धोंडीराम चाटे , भागवत चाटे, हरिश्चंद्र सोनवणे सर, मधुकर जोगदंड, कराड सर, महादेव गित्ते, भगवत देवकते, पत्रकार महादेव गित्ते, आदी उपस्थिती होते.



# अक्कलकुवा येथे भव्य आदिवासी युवा महासंमेलन संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**मोलगी । रविंद्र वळवी**

आदिवासी महासंघ, आदिवासी युवा महासंघ व विविध आदिवासी सामाजिक संघटनांच्या वतीने दिनांक १३ व १४ जानेवारी रोजी अक्कलकुवा शहराजवळील सोरापाडा येथे भव्य आदिवासी युवा महासंमेलन उत्साहात पार पडले. दोन दिवसीय या संमेलनात आदिवासी संस्कृती, परंपरा व भाषेच्या जतनासह समाजातील विविध प्रश्नांवर व्यापक चर्चा करण्यात आली.

हे महासंमेलन तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आले होते. दि.१३ जानेवारी रोजी संमेलनाचे उद्घाटन आमदार आमश्या पाडवी यांच्या हस्ते धरतीमातेचे पूजन करून करण्यात आले. आदिवासी महासंघाचे सचिव जी.डी. पाडवी यांनी प्रस्तावना मांडली, तर अध्यक्षस्थान धिरसिंग पाडवी यांनी भूषविले. महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेशातील युवक-युवतींनी सामाजिक, धार्मिक व राजकीय विषयांवर आपले विचार मांडले.दुसऱ्या दिवशी वीर एकलव्य यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर आमदार आमश्या पाडवी व विविध विचारवंतांनी समाजासमोरील समस्यांवर मार्गदर्शन केले. दुपारी अक्कलकुवा शहरातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारी भव्य सांस्कृतिक महारॅली काढण्यात आली. बिरसा मुंडा व तंट्या भील यांच्या वेशभूषेने रॅलीत विशेष आकर्षण निर्माण झाले. हजारो आदिवासी बांधवांच्या सहभागाने हे महासंमेलन यशस्वी ठरले.



# नालंदा विद्यालय केज येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केज संचलित नालंदा विद्यालय, केज (ता. केज, जि. बीड) येथे दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक श्री. नंदकुमार मस्के, ज्येष्ठ शिक्षक गरड सर व प्रमुख वक्ते वाघमारे एस.बी. सर यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी या थोर व्यक्तींच्या जीवनकार्यावर आधारित मनोगते सादर करत त्यांच्या विचारांचा गौरव केला.

प्रमुख वक्ते वाघमारे एस.बी. सर यांनी राजमाता जिजाऊ यांचे मातृत्व, संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदान तसेच स्वामी विवेकानंद यांच्या राष्ट्रभक्ती, वेदांत तत्त्वज्ञान व तरुणांसाठी दिलेल्या प्रेरणादायी विचारांवर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून देशसेवा, समाजसेवा व आई-वडिलांची सेवा करावी, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक श्री. नंदकुमार मस्के सर यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर मांडत विद्यार्थ्यांनी चारित्र्य, कर्तव्यनिष्ठा व देशप्रेम जपण्याचा संकल्प करण्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. कांबळे एन.व्ही. सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गरड पी.डी., कदम एस.एस., बडे ए.टी. व श्रीमती गुरमे टी.एम. यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ येथे जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ (केंद्र केज, ता. केज) येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून पूजन व अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, तसेच स्वामी विवेकानंद यांच्या विचारांमुळे युवकांमध्ये आत्मविश्वास व राष्ट्रभक्ती निर्माण झाल्याचे सांगितले. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो, असेही त्यांनी नमूद केले.

प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे व संदीप मेघराज ठोंबरे यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती दिली. यावेळी आकाश लोंढे, राहुल बचुटे, आबासाहेब धपाटे, अंजली उटीकर, निलावती भोरे व रोहिणी काळे-थोरात यांनी मनोगते व्यक्त केली. अनेक विद्यार्थिनी राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमास साधनव्यक्ती सय्यद मॅडम, कदम मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बालविवाह प्रतिबंधक शपथ देण्यात आली तसेच रांगोळी व हस्ताक्षर स्पर्धा घेऊन विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवीची विद्यार्थिनी सिद्धी विजय थोरात हिने केले तर आर्या अमोल थोरात हिने आभार मानले.



# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात साने गुरुजी निवासी विद्यालयाने पटकावले प्रथम दोन पारितोषिक



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि.६ जानेवारी २०२६ ते ८ जानेवारी २०२६ या कालावधीत अंबाजोगाई येथे संपन्न झाले.बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी विद्यालय केज या शाळेतील प्रयोगशाळा सहाय्यकगटातून आकाश केदार यांनी प्रथम क्रमांक मिळवला तर उच्च प्राथमिक दिव्यांग गटातून कु.पुजा ठोंबरे हिने प्रथम क्रमांक मिळवला आहे.या दोन्ही प्रयोगांची दि.२८ जानेवारी २०२६ ते १ फेब्रुवारी २०२६ दरम्यान नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.पुजा ठोंबरे हिस विज्ञान विषय शिक्षिका मनिषा नागरगोजे,श्रुती लहाने मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ड. उद्धवराव कराड साहेब, राजेश कापसे,प्रा.डॉ. कविता गित्ते यांनी या सर्वांचे अभिनंदन करून राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077